**तात्काळ/महत्वाचे**
**कालमर्यादा**

जा.क्र. शिउसं/प्राथ-२०२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०२०-२१/ ५३३८
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक : 23 DEC 2020

प्रति,
अध्यक्ष/ सचिव, युरो स्कूल फौंडेशन,
वेस्ट कॅम्पस,सर्व्हे क्रमांक ८१, वाकड ता.मुळशी जि.पुणे-४११०५७

विषय : **सन २०१८-२०१९या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नविन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी परवानगी (इरादापत्र) देण्याबाबत.**

संदर्भ **१.महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२**

**२. शालेय शिक्षण विभाग,मुंबई कडील शासन निर्णय क्रमांक एसएफएस-१०१९/प्र.क्र. ३४८/एसएम-२, दिनांक ८.३.२०१९**

**३. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,मुंबई कार्यासन एसएम-२ मार्फत दिनांक १३.११.२०२० रोजी ईमेल संदेशाव्दारे शासन निर्णय दिनांक ८.३.२०१९ ची प्रत प्राप्त**

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत शैक्षणिक वर्ष **सन २०१८-२०१९** मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरिता /विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भीय क्र. १ चे शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

| शासन यादी अ.क्र | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नांव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नांव व पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार,नवीन शाळा/दर्जावाढ व मंडळ संलग्नता | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| - | पुणे | युरो स्कूल फौंडेशन, वेस्ट कॅम्पस,सर्व्हे क्रमांक ८१, वाकड ता.मुळशी जि.पुणे | युरो स्कूल ,वेस्ट कॅम्पस,सर्व्हे नं.८१,वाकड,ता.मुळशी जि.पुणे | **इंग्रजी** | **नवीन शाळा (आय.सी.एस.ई.) (स्वयंअर्थसहाय्यित शाळा )** | **प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इ.१ ली ते इ.१२ वी) सर्व शाखा** | **२०१८-२०१९** |

**अटी व शर्ती :-**

१. संबंधित संस्थेने एकूण रु.३०,०००/-किंमतीचे चलन व सोसायटी नोंदणी अधिनियम १८६० किंवा मुंबई विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० किंवा कंपनी अधिनियम, २०१३ कलम ८ अ नुसार नोंदणी केलेल्या प्रमाणपत्राची प्रत शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,पुणे या कार्यालयाकडे तीन महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक आहे. असे शासन निर्णयातील २.२ अटी व शर्ती मधील अट क्रमांक १ मध्ये नमूद आहे. सदर बाबींची पुर्तता करणेसाठी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद पुणे यांना प्राधीकृत करणेत येत आहे. त्यानुसार उपरोक्त अटीची पुर्तता शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद पुणे यांनी तीन महिन्याच्या आत करुन त्याचा अहवाल शासनास सादर करावा.

२. पात्र ठरलेल्या संबंधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम २००९ मधील तरतुदीची पुर्तता करुन **सन २०१८-२०१९** या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे.

३. ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्हयाच्या शिक्षणाधिका-यांकडे अर्ज करावेत.

४. ज्या व्यवस्थापनास **सन २०१८-२०१९** करिता या शासन निर्णयाव्दारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बार्बीची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रददबातल ठरेल.

५.परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे/कार्यपध्दतीचे तसेच महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन/ मुख्य अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

६.संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम,२००९ मधील तरतदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

७.संस्थने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रदद समजण्यात येईल.

८. यु-डायस डाटा या शासन निर्णयाव्दारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/दर्जावाढ शाळाबाबत जिल्हानिहाय U-DISE (Unified District Information System for Education ) मध्ये माहिती भरताना **स्वयंअर्थसहायित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा** म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद,मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यांत येत आहे. त्याचप्रमाणे संस्थेने सर्व संबंधितांच्या माहितीकरिता **स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा (आय.सी.एस.ई)/दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा** असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशव्दारावर लावणे आवश्यक राहील.

९.. परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

(औदुंबर उकिरडे)
**शिक्षण उपसंचालक,**
**पुणे विभाग पुणे-१.**

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी,
१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे,

प्रत : माहितीसाठी सविनय सादर
१. मा.अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय, विस्तार भवन,मुंबई-३२.
२. मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. मा. शिक्षण संचालक (प्राथमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे